# परराष्ट्र धोरण आणि राष्ट्रीय सुरक्षा

**डॉ. रायन महाजन*** — *श्री बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर*

**डॉ. राहुल चुटे**** — *एन.पी.डब्लू. कला व विज्ञान महाविद्यालय, मुरमाडी*

कोणत्याही देशाचे परराष्ट्र धोरण इतिहासाशी जवळून संबंधित असते. भारताचे परराष्ट्र धोरण देखील इतिहास आणि स्वातंत्र्य चळवळीशी संबंधित आहे. ऐतिहासिक वारसा म्हणून, भारताच्या परराष्ट्र धोरणात आज भारतीय स्वातंत्र्य चळवळीतून निर्माण झालेल्या अनेक तथ्यांचा समावेश आहे. शांततापूर्ण सहअस्तित्व आणि जागतिक शांतता ही कल्पना हजारो वर्षांच्या जुन्या विचारसरणीचा परिणाम आहे जी महात्मा बुद्ध आणि महात्मा गांधी सारख्या विचारवंतांनी मांडली होती. त्याचप्रमाणे भारताच्या परराष्ट्र धोरणात वसाहतवाद, साम्राज्यवाद आणि वर्णभेदाच्या धोरणाला होणारा विरोध ही महान राष्ट्रीय चळवळीची निर्मिती आहे. प्राचीन काळी सुद्धा भारताचे संपूर्ण जगाशी व्यावसायिक, सांस्कृतिक आणि धार्मिक संबंध आहेत. काळाच्या ओघात भारताच्या अनेक भागात अनेक वेगवेगळे राजे होते, भारताचे स्वरूपही बदलत राहिले, पण जगावर भारताचे संबंध कायम राहिले. सामरिक संबंधांबद्दल बोलताना भारताचे वैशिष्ट्य म्हणजे ते कधीही आक्रमक राहिले नाही.

1947 मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यापासून भारताने बहुतेक देशांशी सौहार्दपूर्ण संबंध ठेवले आहेत. भारत नेहमीच जागतिक व्यासपीठांवर सक्रिय असतो. आर्थिकदृष्ट्या भारताने 1990 नंतर जगावर प्रभाव टाकला आहे. सामरिकदृष्ट्या, भारताने आपली शक्ती कायम ठेवली आहे आणि जागतिक शांततेसाठी शक्य तितके योगदान देत आहे. भारताचे पाकिस्तान आणि चीनसोबतचे संबंध काहीसे ताणलेले आहेत, परंतु रशियाशी सामरिक संबंधांव्यतिरिक्त भारताचे इस्रायल आणि फ्रान्ससोबत व्यापक संरक्षण संबंध आहेत.

**परराष्ट्र धोरण म्हणजे काय?**

कोणत्याही स्वतंत्र आणि सार्वभौम देशाचे परराष्ट्र धोरण मुळात त्या देशाची तत्वे, इच्छा आणि ध्येय साध्य करण्यासाठी प्रयत्न करतो. ज्याद्वारे तो देश इतर देशांशी संबंध प्रस्थापित करतो. कोणताही देशाचे परराष्ट्र धोरण हा त्याच्या अंतर्गत धोरणाचा एक भाग आहे जो त्या देशाच्या सरकारने बनवला आहे. किंबहुना परराष्ट्र धोरण हे शासक वर्गाच्या इच्छेचे फलित आहे, ज्याची अंमलबजावणी सरकारने करायची आहे. परराष्ट्र धोरणाची व्याख्या अनेक विद्वानांनी खालीलप्रमाणे केली आहे.

मॉडेल्स्कीच्या यांच्या मते, “एक राष्ट्र इतर राष्ट्रांच्या वागण्यात बदल घडवून आणण्याचा निर्धार करतो आणि क्रियाकलाप आंतरराष्ट्रीय वातावरणास अनुकूल बनविण्यासाठी उपाययोजना आखतो त्यास परराष्ट्र धोरण म्हणतात.”

**परराष्ट्र धोरण आणि राष्ट्रीय हितः-**

परराष्ट्र धोरण आणि राष्ट्रीय हित यांचा जवळचा संबंध आहे. राष्ट्रीय हिताच्या संदर्भात परराष्ट्र धोरण स्वतःच परिभाषित केले जाऊ शकते. परराष्ट्र धोरणांतर्गत राष्ट्रीय हिताचे रक्षण करणे आणि ती पुढे नेण्यासाठी तर्कशुद्ध निर्णय घेतले जातात. कोणत्याही देशाच्या परराष्ट्र धोरणाची उद्दिष्ट्ये सुरक्षा आणि एकता राखणे, राष्ट्रीय सुरक्षा, आर्थिक हितसंबंधांचा धोका दूर करणे, राष्ट्रीय शक्ती विकसित करणे ज्यामुळे राष्ट्रीय प्रतिष्ठा, राजकीय वाढ होईल. व्यवस्था मजबूत करण्यासाठी आणि इतर देशांमध्ये निर्यात करण्याची इच्छा, एक नवीन आंतरराष्ट्रीय व्यवस्थेचा उदय आणि त्याला बळकट करण्याचे प्रयत्न इ. यासर्व उद्दिष्टांचा संच देशाचे राष्ट्रीय हित आहे म्हणजेच राष्ट्रीय हित परराष्ट्र धोरणाच्या सर्व उद्दिष्टांना सामावून घेते. कोणतेही देशाच्या परराष्ट्र धोरणाचे यश हे राष्ट्रीय हित कोठे कार्य करते यावर अवलंबून असते. खरं तर, राष्ट्रीय हित हे परराष्ट्र धोरणाचे मूलभूत उद्दिष्ट किंवा अंत आहे. कोणत्याही देशाचे परराष्ट्र धोरण केवळ राष्ट्रीय हिताच्या संदर्भात ठरवले जाते. भारताने विशिष्ट देशासाठी स्वतःचे विशेष धोरण देखील स्वीकारले आहे. मार्गान्थोस म्हणाले "जोपर्यंत जग राजकीयदृष्ट्या राष्ट्रांमध्ये संघटित आहे, तोपर्यंत राष्ट्रीय हित आहे. आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये कोणीही कायमचा मित्र किंवा कायमचा शत्रू नसतो. आंतरराष्ट्रीय संबंध सतत बदलत असतात. त्यामुळे राष्ट्रीय हितामध्येही काही बदल अर्थात, परराष्ट्र धोरणातही काय बदल होतो ते या उदाहरणावरून लक्षात येईल. भारताचे पाकिस्तान सोबत १३ सप्टेंबर २००२ नंतर धोरण बदलले. संसदेवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर त्याने पाकिस्तानशी

असलेले राजनैतिक संबंध तोडले होते. पण या वर्षी (२००४) भारत पुन्हा त्याच्या क्रिकेट संघाला पाकिस्तानमध्ये खेळण्याची परवानगी दिली आणि लाहोर बससेवा पुन्हा सुरू केली आणि सीमेवरून सैन्य मागे घेऊन युद्धबंदीसारखी परिस्थिती निर्माण केली. असे राष्ट्रीय हितासाठी केले गेले. सर्व देशांच्या परराष्ट्र धोरणांमध्ये असेच बदल दिसून येतात. जेव्हा परराष्ट्र धोरण राष्ट्रीय हिताचे ध्येय साध्य करण्यात अपयशी ठरते, तेव्हा ते बदलले पाहिजे. परराष्ट्र धोरणाच्या आचरणात राष्ट्रीय हिताचे ध्येय महत्वाची भूमिका बजावते. वर्नन वान डायक यांच्या मते,"राष्ट्रीय हिताची मांडणी एक अशा गोष्टीच्या रुपात केली जाऊ शकते ज्याचे संरक्षण आणि उपलब्धता राज्य एकमेकांसोबत च्या स्पर्धेने करू इच्छितात." राष्ट्रीय हित आणि परराष्ट्र धोरणाचा परराष्ट्र धोरणावर राष्ट्रीय हिताने प्रभाव पाडण्यासाठी परस्पर संबंध जाणून घेणे, ती कोणती भूमिका बजावते याचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. राष्ट्रीय हिताची प्रभावी भूमिका हे खालीलप्रमाणे समजली जाऊ शकते.

१. राष्ट्रीय हित आंतरराष्ट्रीय वातावरणात परराष्ट्र धोरणाची जागा घेते.
२. राष्ट्रीय हित परराष्ट्र धोरण नियंत्रित करणाऱ्या मापदंडांना पर्याय देते.
३. राष्ट्रीय हित परराष्ट्र धोरणाला सातत्य आणि गतिशीलता प्रदान करते.
४. परराष्ट्र धोरण राष्ट्रीय हिताच्या संदर्भात बदललेल्या आंतरराष्ट्रीय वातावरणाशी जुळवून घेते. म्हणजेच, बदललेल्या आंतरराष्ट्रीय परिस्थितीनुसार ते स्वतःला साचेबद्ध करते.
५. राष्ट्रीय हित परराष्ट्र धोरणाला मजबूत आधार प्रदान करतात कारण ते समाजाचे समन्वित प्रयत्न आहेत आणि सहमतीवर आधारित मूल्ये व्यक्त करा.
६. राष्ट्रीय हित परराष्ट्र धोरणाचे मार्गदर्शन करतात. ज्याप्रमाणे राष्ट्रीय हित हा परराष्ट्र धोरणाचा आधार असतो, त्याचप्रमाणे परराष्ट्र धोरण हा राष्ट्रीय हिताचा आधार असतो. कधीकधी राष्ट्रीय हित इतके अस्पष्ट असतात की, ते परराष्ट्र धोरणाद्वारे नियंत्रित केले पाहिजेत. उदाहरणार्थ, सुरक्षेचे हित इतके अस्पष्ट आहे की ते स्पष्ट होण्यासाठी ते परराष्ट्र धोरणाशी संबंधित असणे आवश्यक आहे. ज्याप्रमाणे राष्ट्रीय हित हा परराष्ट्र धोरणाचा आधार आहे, त्याच प्रकारे राष्ट्रीय हिताला आकार दिला जातो.

**परराष्ट्र धोरण आणि राष्ट्रीय सुरक्षाः-**

राष्ट्रीय सुरक्षा संबंधी भीती लक्षात घेऊन कोणत्याही देशासाठी परराष्ट्र धोरणाचे निर्धारण करणे खूप कठीण आणि अडचणीचे कार्य आहे. आधुनिक काळामध्ये राष्ट्रीय सुरक्षेच्या विकासामध्ये परराष्ट्र धोरण, ज्याचा संबंध राष्ट्राच्या प्रशासकीय व्यवस्थेशी असतो. राष्ट्रीय सुरक्षेच्या उद्देशाने आंतरराष्ट्रीय स्तरावर एका देशाला दुसऱ्या देशाचे समर्थन प्राप्त करणे आवश्यक आहे. हे त्या देशाच्या परराष्ट्र धोरणावर निर्धारित करते कि, तो देश आंतर्राष्ट्र्ये स्तरावर किती राष्ट्रांचा सहकार्य आणि समर्थन प्राप्त करतो. परराष्ट्र धोरणाचे निर्धारण करतेवेळी आंतरराष्ट्रीय संबंधाना देखील महत्व देणे आवश्यक आहे. आधुनिक युगामध्ये कुटनीतीचा राष्ट्रीय सुरक्षेवर मोठा प्रभाव पडतो. ज्या देशातील राजनयिक बुद्धिमान असतात तो देश आंतरराष्ट्रीय क्षेत्रात आपले स्थान मजबूत करीत असतो. त्याच्या समर्थकाची संख्या वाढते. असा राष्ट्र जलद महासत्ता बनण्याच्या दिशेने वाटचाल करीत असतो.

परराष्ट्र धोरण आणि राष्ट्रीय सुरक्षा धोरण एक दुसऱ्याला पूरक आहेत. म्हणूनच परराष्ट्र तसेच संरक्षण मंत्रालयाला मंत्रिमंडळाच्या सामुहिक उत्तरदायित्वाच्या अधीन राहून पूर्ण सहकार्य आणि सोबत राहून कार्य करायला पाहिजे. परराष्ट्र धोरण आणि संरक्षण धोरण या दोघांचा उद्देश राष्ट्रीय हित हेच आहे. दोघांतील अंतर फक्त एवढाच आहे कि, परराष्ट्र धोरण राजकीय साधन आहे तर सुरक्षा सैनिकी साधन आहे. संरक्षण धोरणाचे कार्य देशातील त्या सर्व साधनांना एकत्रित करण्याचे जे राष्ट्रीय सुरक्षा आणि राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने आवश्यक असतात. हे साधन प्रामुख्याने सैनिकी आहेत, परंतु इतर देशांसोबत राजकीय, आर्थिक इत्यादी आदानप्रदान च्या रुपात प्राप्त होतात. म्हणून परराष्ट्र धोरण आणि संरक्षण धोरणाच्या मध्ये रेषा ओढणे शक्य नाही. परराष्ट्र धोरणाचे कमकुवतपणा तसेच मजबुती त्या राष्ट्राच्या संरक्षण क्षमतेवर निर्भर करतो, परंतु कधी कधी संरक्षण क्षेत्राची कमतरता परराष्ट्र धोरणाद्वारे भरून काढता येते. उदाहरणार्थ जेव्हा १९७१ साली भारताला अमेरिकेचा दृष्टीकोन प्रतिकूल वाटत होता आणि पाकिस्तान तसेच चीन कडून धोका असल्याचे दिसत होते, तेव्हा भारताने रशिया सोबत "भारत सोवियत शांती करार १९७१" करार केला जो काळानुसार १९७१ मधील भारत पाक युद्धात

भारतासाठी फायदेशीर करार सिध्द झाला. सुरक्षा धोरणाचा उद्देश राष्ट्राचे अस्तित्व आणि स्वातंत्र्याच्या मुळात आहे. हे आनागर्गात शांतता आणि कायदेशीर व्यवस्था बनवून ठेवण्यासाठी मदत करते. राष्ट्रीय हिताच्या संरक्षणा संबंधी जबाबदारीचे निर्वाहन करण्यासाठी प्रत्यक राष्ट्र संरक्षण धोरण निर्धारित करीत असतो कारण जेव्हा केव्हा एखादा आक्रामक राष्ट्र आपल्या राष्ट्रीय सुरक्षा, अखंडता तसेच सार्वभौमत्वाला आवाहन देण्याचा प्रयत्न करत असेल तेव्हा त्याला प्रत्युत्तर दिल्या जाऊ शकेल. कोणताही देश आपल्या राष्ट्रीय सुरक्षेसोबत ढवळाढवळ सहन करू शकत नाही. भारताचे पूर्व संरक्षण मंत्री यशवंत सिंह यांनी अस म्हटलं आहे कि, "व्यापार, वाणिज्य, संस्कृती आणि सैनिकी सारख्या क्षेत्राची सीमा अमर्याद आहे. मुख्य गोष्ट म्हणजे आम्ही राष्ट्रीय सुरक्षेला घेऊन कोणतीही तडजोड करणार नाही."

भारताच्या परराष्ट्र धोरणामध्ये पंडित नेहरू पासून ते पंतप्रधान मोदी यांच्या कालखंडाचा विचार केला तर भारताच्या परराष्ट्र धोरणामध्ये अनेक बदल झाल्याचे दिसून येते. परिस्थिती पाहून भारताने अलिप्ततावादी धोरणाचा स्वीकार केला आणि वेळ प्रसंग पाहून आपल्या भूमिकेत बदल केल्याच्या अनेक घटना पाहायला मिळतात. त्याच कारणाने आज भारताचा प्रभाव आंतरराष्ट्रीय राजकारणात दिसून येतो.

**संदर्भ सूची**

१. *George Modelski, A Theory of Foreign Policy, London, 1962, page-06*
२. *गांधी जी राय, अंतरराष्ट्रीय राजनीती, भारती भवन, पटना, १९९३, p पृष्ठ क्र.-८१*
३. *राज चेंगप्पा, "दृढता और जोश से भारत की आला जमात मे शामिल", इंडिया टुडे, नई दिल्ली, वर्ष १८, अंक १०, (३० दिसम्बर २००३-५ जनवरी २००४) पृष्ठ क्र.-१८*